157


# VJTI MUMBAI
वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था
Veermata Jijabai Technological Institute
(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019
Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in


क्र.आस्था/मागासवर्गीय कक्ष समिती/६६० /२०२४ दिनांक: ०९/०५/२०२४

09 MAY 2024

## कार्यालयीन आदेश:

शासन परिपत्रक क्र. बीसीसी २००४/१६६६/प्र.क्र.६१/०४/१६-ब दि.१०/०८/२००४ नुसार या संस्थेतील मागासवर्गीय अधिकारी, कर्मचारी यांच्या शासकीय सेवेतील आरक्षणाबाबतचे धोरण व शासकीय आदेशाची अंमलबजावणी योग्य रीतीने होते किंवा कसे हे पाहण्याकरिता तसेच संस्थेतील मागासवर्गीय प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींचे निराकरण करण्याकरिता या संस्थेतील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांची पुढीलप्रमाणे मागासवर्गीय कक्ष समिती स्थापन करण्यात येत आहे.

१. डॉ.के.के. सांगळे, संरचना विभाग , समन्वयक
२. डॉ. एस. वाय. म्हस्के, स्थापत्य विभाग, सदस्य
३. श्री. पी.एस. चौधरी, स्थापत्य विभाग, सदस्य
४. डॉ. एस.आर. वाघ, विद्युत विभाग, सदस्य
५. डॉ. एन.एन. वानखेडे, टेक्निकल ॲन्ड अप्लाईड केमिस्ट्री विभाग, सदस्य
६. श्रीमती एम.एस. शहाकर, आस्थापना विभाग, सदस्य
७. श्री. पी.डी. जोहरे, आस्थापना विभाग, सदस्य
८. पदवी विद्यार्थी (२) (विद्यार्थी-१, विद्यार्थिनी-१)
९. पदव्युत्तर पदवी विद्यार्थी (१)
१०. पदविका विद्यार्थी (२) (विद्यार्थी-१, विद्यार्थिनी-१)
११. पीएचडी विद्यार्थी (२) (विद्यार्थी-१, विद्यार्थिनी-१)

वरील समिती सदस्य शासन परिपत्रकास अनुसरुन कार्य करतील. समितीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणे, विद्यार्थी वर्ग आणि शिक्षक- शिक्षकेतर कर्मचा-यांकरिता विविध प्रकारच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करणे, मागासवर्गीय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यास मदत करणे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे (संयुक्त/ एकाकी) नियोजन करुन पार पाडणे इत्यादींचा प्रामुख्याने समावेश असेल.

समितीने त्यांचा वार्षिक अहवाल संचालक, व्हीजेटीआय व समाजकल्याण विभाग महाराष्ट्र शासन यांना वेळोवेळी सादर करावा.

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE MATUNGA MUMBAI - 19

संचालक

०९.०५

प्रति:
**वरील सर्व संबंधित प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी**

प्रत:
सर्व विभागप्रमुख, विभाग इनचार्ज, प्रबंधक, सर्व अधिष्ठाता
ग्रंथालय विभाग, प्रशिक्षण (TPO), परिक्षा नियंत्रक (पदवी व पदविका), प्रिन्सिपल रेक्टर -व्ही.जे.टी.आय. वसतीगृह, लेखाधिकारी, मुख्य कार्यालय, आस्थापना विभाग, भांडार विभाग, सीसीएफ विभाग, संचालकांचे स्विय
यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देणे.
अभिलेख

(१) कार्यालयीन आदेश फाईल मध्ये घ्यावे
(२) वरिष्ठ अनुक्रमांक १ ते ७ अधिकारी व कर्मचारी
... file मध्ये ... घ्यावी.

Desktop/estb/karyalayin aadesh

GR-200408011718250001-0100

शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/
नगरपालिका/महानगरपालिका इत्यादी कार्यालया-
मध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२००४/१६६६/प्र.क्र.६१/०४/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १० ऑगस्ट,२००४

पहा : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :- बीसीसी-१०८५/२९८८/
१६-ब, दिनांक १३ ऑगस्ट,१९८६.

**शासन परिपत्रक :**

मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणाबाबतचे धोरण व शासकीय आदेशांची अंमलबजावणी योग्यरितीने होते किंवा नाही हे पहाण्यासाठी तसेच संबंधीत कार्यालयातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक बार्बीचे निराकरण करण्यासाठी वरील शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखाली विभागीय आयुक्त स्तरावर मागासवर्ग कक्ष निर्माण करण्यात आले आहेत. तथापि सर्वच शासकीय/निमशासकीय तसेच मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका, शासकीय उपक्रम, अनुदानित संस्था, विद्यापिठे, सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादिमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबतचे आदेश नाहीत. तथापि काही मोठ्या कार्यालयात मागासवर्ग कक्ष स्थापन केलेला आहे. त्यामुळे कार्यालयांमध्ये बिंदूनामावल्या ठेवणे व मागासवर्गीयांना आरक्षण विषयक लाभ व सवलती मिळण्यास मोलाचे सहकार्य मिळत असल्याचे आढळून आले आहे. ही बाब विचारात घेवून मोठ्या शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये खालील मार्गदर्शक सूचना विचारात घेवून मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत कार्यवाही करावी.

१) ज्या कार्यालयांमध्ये १००० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारीवृंद आहे, अशा कार्यालयांमध्ये, मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

२) ज्या कार्यालयामध्ये १००० पेक्षा अधिक अधिकारी/कर्मचारीवृंद नाही मात्र अशा कार्यालयांच्या अधिपत्याखाली क्षेत्रीय कार्यालये आहेत व अशा क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्याचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांना दिलेले असतील तर अशा क्षेत्रीय कार्यालयातील आरक्षण तपासणीकरीता संबंधीत विभागीय कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

३) सर्व विद्यापिठे, सर्व उपसंचालक/सहसंचालक (ज्यांना शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यता देण्याचे अधिकार आहेत.) यांच्या कार्यालयामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

४) या व्यतिरिक्त ज्या कार्यालयाला विधानमंडळाच्या अनुसूचित जाती/जमाती/ वि.जा.भ.ज./ इ.मा.व.कल्याण समितीने विशेष करुन (specifically) आदेश दिलेले असतील अशा कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावे.

/प.पा.पा.

५) सदर मागासवर्ग कक्षाकरीता नेमावयाच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाची संख्या ही त्या कार्यालयाच्या एकूण अधिकारी/कर्मचारी वर्गाची संख्या, त्या कार्यालयाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या व त्या कार्यालयांच्या कार्यक्षेत्राखाली येणाऱ्या कार्यालये/शैक्षणिक संस्था विचारात घेवून तसेच स्थापन करावयाच्या मागासवर्ग कक्षाचे कामकाज विचारात घेवून निश्चित करावयाची आहे.

६) असा निश्चित केलेला अधिकारी/कर्मचारीवृंद स्वतंत्रपणे पदे निर्माण करुन किंवा सद्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यामधून मागासवर्ग कक्षाला उपलब्ध करुन देण्याबाबत प्रशासकीय विभागाने वा संबंधीत कार्यालयाने निर्णय घ्यावा.

२. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या परिपत्रकानुसार योग्य त्या सूचना विनाविलंब निर्गमित करण्यात याव्यात व त्याची एक प्रत या विभागाकडे पाठवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दे.त्र्यं.कुमावत )
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना शाखा),
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती,